तरुण भारत
सदाफुली
बुधवार, २३ जुलै २०२५

आतील पानावर

पान २ – 'परम सुंदरी'ची रिलीज डेट पुढे ढकलली
पान ३ –शिल्पाला वाटते मल्याळम चित्रपटाची भीती
पान ४ – अल्लू अर्जुनसोबत दिसणार मराठमोळी...
पान ५– प्रेम हे हवंच. पण, पैसाही महत्त्वाचाच!
पान ६ – विद्या बालनचा नवा लूक

# सूर्याच्या नव्या चित्रपटाची घोषणा

सूर्या या दाक्षिणात्य अभिनेत्याच्या ४५ व्या चित्रपटाची घोषणा झाली आहे. या चित्रपटाचे नाव 'करुप्पु' आहे. निर्मात्यांनी या चित्रपटाचे पोस्टर जारी केले आहे. या पोस्टरवर एक घोडेस्वार दिसून येत आहे, तर मधल्या भागात एक इसम उभा असून त्याच्या हातात एक घातक अस्त्र असल्याचे दिसून येत आहे. सूर्या यापूर्वी 'रेट्रो' या चित्रपटात दिसून आला होता. हा चित्रपट फारसा चालला नव्हता. तर त्याच्या नव्या चित्रपटाचे दिग्दर्शन आर.जे. बालाजी करत आहे. 'करुप्पु' या चित्रपटात तृषा कृष्णन मुख्य भूमिकेत दिसून येणार आहे. या चित्रपटाची निर्मिती ड्रीम वॉरियर पिक्चर्सकडून केली जात आहे. चित्रपटाला साई अभ्यंकर यांचे संगीत लाभणार आहे. निर्मात्यांनी चित्रपटाचे पोस्टर करत कॅप्शनदाखल 'गर्व आणि उत्साहासोबत आम्ही सुर्याच्या ४५ व्या चित्रपटाचे नाव जाहीर करत आहेत. करुप्पू हे नाव आमच्या कहाणीचा गाभा दर्शविणार आहे. या कहाणीला हृदय, भावना आणि उद्देशाने आकार देण्यात आला' असल्याचे म्हटले गेले आहे.






# इंडस्ट्रीत सगळेजण एकमेकांवर जळतात



फराह खान एक कोरिओग्राफर, दिग्दर्शिका आणि कंटेंट क्रिएटर देखील आहे. ती यूट्यूबवर एक कुकिंग चॅनल चालवते, सेलिब्रिटींच्या घरी भेट देते आणि त्यांच्याशी बोलते. अलीकडेच फराह जॅकी भगनानी आणि रकुल प्रीतला भेटली. या दरम्यान फराहने तिच्या एका फ्लॉप चित्रपटाचा उल्लेख केला, ज्याच्या अपयशामुळे बॉलिवूडमधील अनेक लोक आनंदी झाले. तो चित्रपट कोणता होता? आणि फराहने कोणते खुलासे केले? हे जाणून घेऊ.. फराह तिच्या कुकिंग यूट्यूब चॅनलसाठी जॅकी भगनानी आणि रकुल प्रीतच्या घरी पोहोचली. स्वयंपाकाव्यतिरिक्त त्यांनी करिअर आणि चित्रपटांबद्दलही चर्चा केली. या संभाषणात जॅकीने सांगितले की जेव्हा त्याचा निर्मित चित्रपट 'बेलबॉटम' फ्लॉप झाला तेव्हा लोकांनी खूप वाईट कमेंट केल्या. यावर फराह खानला आठवले की तिच्यासोबतही असेच घडले होते. फराह सांगते की २०१० मध्ये 'तीस मार खान' चित्रपटाच्या अपयशावर बॉलिवूडमधील अनेक लोक आनंदी होते. ती म्हणते, 'आपल्या इंडस्ट्रीमध्ये लोक स्वतःच्या यशापेक्षा इतरांच्या अपयशावर जास्त आनंदी असतात.' मला आठवतंय जेव्हा 'तीस मार खान' हा चित्रपट प्रदर्शित झाला आणि बॉक्स ऑफिसवर चालला नाही, तेव्हा बॉलिवूडमध्ये उत्सवाचे वातावरण होते. मी ज्या लोकांसोबत काम केले आहे त्यांचा दृष्टिकोन 'अभी आयी ना लाईन पर' असा होता. पण माझा हा चित्रपट जनरेशन झेडला आवडतो.' या व्हीलॉगमध्ये फराह खान जॅकी भगनानीला सांगते, 'जॅकी, आम्हालाही निर्माता व्हायचे आहे.' यावर जॅकी उत्तर देतो, 'निर्माता बनू नकोस.' फराह हसायला लागते आणि म्हणते, 'हो, निर्माता बनू नकोस, कारण आधी त्याचे (जॅकी) दहा मजले होते आणि निर्माता झाल्यानंतर फक्त पाचच उरले.'



# कंगणा अन् आर माधवन दहा वर्षांनी एकत्र

कंगना राणौत आणि आर माधवनची जोडी चाहत्यांना खूप आवडते. दोघांनीही दोन चित्रपटांमध्ये एकत्र काम केले आहे. तनु वेड्स मनु (२०११) आणि तनु वेड्स मनु (२०१५) चा सिक्वेल. हे दोन्ही चित्रपट हिट ठरले. दोन्ही चित्रपटांमधील कंगना आणि माधवनची केमिस्ट्री प्रेक्षकांना खूप आवडली. आता दहा वर्षांनंतर ही जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पुनरागमन करणार आहे. मिळालेल्या माहितीनुसार, कंगना आणि आर माधवन हे सायकॉलॉजिकल थ्रिलर कथेवर आधारित एका चित्रपटामध्ये एकत्र दिसणार आहेत. यामुळे त्यांची जोडी पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर पाहण्यासाठी त्यांचे चाहते आतुर झाले आहेत.

डेक्कन क्रॉनिकलमधील एका वृत्तानुसार, या चित्रपटाचे नाव 'सर्कल' असल्याचे सांगण्यात आले आहे. या चित्रपटाचे काम शेवटच्या टप्प्यात आले आहे. या सायकोलॉजिकल थ्रिलर चित्रपटाचे शूटिंग भारतातील उटी, जयपूर, चेन्नई आणि हैदराबाद या शहरात करण्यात आले आहे. या चित्रपटाची निर्मिती टिडेंट आर्टचे रवींद्रन यांनी केली आहे, या चित्रपटातील कंगणा आणि आर माधवन यांच्या भूमिका गुलदस्त्यात ठेवण्यात आल्या आहेत. कंगना राणौत आणि आर माधवन दोघेही कलाकार त्यांच्या दमदार अभिनयासाठी ओळखले जातात, या चित्रपटात त्यांची भूमिका काय असणार याची माहिती चित्रपटाची अधिकृत घोषणा आणि ट्रेलर आल्यानंतर समजणार आहे.



अभिनेता सिद्धार्थ मल्होत्रा आणि अभिनेत्री जान्हवी कपूर एका नव्या चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीस येणार आहे. 'परम सुंदरी' या चित्रपटात त्यांची जोडी पाहायला मिळणार असल्याने चाहतेही उत्सुक आहेत. मात्र या चित्रपटाबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. या सिनेमाच्या प्रदर्शनाची तारीखच पुढे ढकलण्यात आली आहे. जेव्हा चित्रपटाचा टीझर रिलीज करण्यात आला होता, तेव्हा चित्रपटाची रिलीज डेट २५ जुलै सांगितली गेली होती. पण आता हा चित्रपट ऑगस्टमध्ये रिलीज केला जाणार असल्याचे समोर आले आहे. राजकुमार रावचा 'मालिक' सिनेमा नुकताच रिलीज झाला. या सिनेमावेळी थिएटरमध्ये 'परम सुंदरी'चा टीझर दाखवण्यात आला. त्यात नवीन रिलीज डेट समोर आली. सिनेमा ऑगस्ट महिन्यात येत आहे हे त्यातून स्पष्ट झालं. रिलीज डेट पुढे नेण्याबद्दल अद्याप मेकर्सने अधिकृत घोषणा केलेली नाही. २५ जुलै रोजी अजय देवगणचा 'सन ऑफ सरदार २' रिलीज होणार आहे. त्यामुळेच 'परम सुंदरी' पुढे ढकलला असल्याची चर्चा आहे. मात्र, चित्रपटाची नवीन रिलीज डेट अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. 'परम सुंदरी'चा टीझर मे महिन्यात रिलीज करण्यात आला होता. यामध्ये सिद्धार्थ मल्होत्राला उत्तर भारतातील मुलगा परम आणि जान्हवी कपूरला दक्षिण भारतातील मुलगी सुंदरीच्या भूमिकेत दाखवण्यात आले आहे. टीझरमध्ये चित्रपटाची रिलीज डेट २५ जुलै सांगितली गेली होती. मात्र आता हा चित्रपट पुढील महिन्यात प्रेक्षकांच्या भेटीस येणार असल्याचे समोर आले आहे.



# 'परम सुंदरी'ची रिलीज डेट पुढे ढकलली

# शिल्पाला वाटते मल्याळम चित्रपटाची भीती

बॉलिवूड अभिनेता संजय दत्त आणि अभिनेत्री शिल्पा शेट्टी यांच्या प्रमुख भूमिका असलेल्या 'घऊः द डेविल' या चित्रपटाचा धमाकेदार टीझर प्रदर्शित झाला आहे. हा टीझरला प्रेक्षकांचा तुफान प्रतिसाद मिळालाय. बॉलीवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी 'केडी- द डेव्हिल' या कन्नड चित्रपटात दिसणार आहे. तिने मल्याळम चित्रपटाची चाहती असूनही, कधीही त्यात का काम केले नाही हे सांगितले आहे 'केडी' चित्रपटाच्या टीझर लाँचच्या वेळी तिने तिच्या संकोचाबद्दलचा खुलासा केला. शिल्पा शेट्टीने तमीळ, तेलुगू, कन्नड व हिंदी चित्रपटांमध्ये काम केले आहे. तिने खुलासा केला की, तिला मल्याळम चित्रपट उद्योगातील निर्मात्यांकडून अनेक ऑफर आल्या होत्या. शिल्पाने पिंकव्हिलाला सांगितले, मी त्यांना कधीही हो म्हटले नाही. कारण मला भीती वाटते. शिल्पा म्हणाली की, तिचे मल्याळम चित्रपटांवर खूप प्रेम आहे. ती म्हणाली, मला मल्याळम चित्रपट खूप आवडतात आणि ही इंडस्ट्री भावना कशा प्रकारे सादर करते ते पाहून मी आश्चर्यचकितही होते. मल्याळम चित्रपटांमधील कथा आणि अभिनय वेगळ्या पातळीवर असल्याचेही तिने सांगितले. ती पुढे म्हणाली, मला कधीच वाटलं नव्हतं की, जर मी या इंडस्ट्रीत काम केलं, तर मी माझ्या व्यक्तिरेखेला न्याय देऊ शकेन. पण बघूया, कदाचित मी एक दिवस मल्याळम चित्रपट करीन. शिल्पाला जेव्हा विचारण्यात आले की, मल्याळम इंडस्ट्रीमध्ये असा कोणी अभिनेता आहे का, ज्याच्याबरोबर तिला काम करायला आवडेल, तेव्हा तिने मोहनलालचे नाव घेतले. ती म्हणाली, तो अद्भुत आहे. इतक्या वर्षांनंतरही तो तसाच दिसतो. तो भारतीय चित्रपटसृष्टीतील सर्वांत अद्भुत अभिनेत्यांपैकी एक आहे. तिने असेही सांगितले की, तिचा आवडता चित्रपट 'नोक्केथाधुरथु कन्नम नट्टू' (१९८४) आहे. "KD : द डेविल' या चित्रपटात शिल्पा शेट्टी बर्याच वर्षांनंतर अभिनेता संजय दत्तबरोबर पुन्हा एकदा मोठ्या पडद्यावर झळकणार आहे. त्यामुळे प्रेक्षक या चित्रपटाच्या प्रदर्शानाची उत्सुकतेने वाट पाहत आहेत. 'केडी- द डेव्हिल' बद्दल बोलायचे झाले तर, प्रेम यांनी याचे दिग्दर्शन केले आहे. ध्रुव सरजाच्या या चित्रपटात संजय दत्त, रेश्मा नानैया, व्ही. रविचंद्रन व रमेश अरविंद यांच्याही भूमिका आहेत.





# मी अक्षय कुमारपेक्षा मोठा स्टार होतो!

अभिनेता दीपक तिजोरीने १९९० च्या दशकात नाव आणि प्रसिद्धी मिळवली. महेश भट यांच्या 'आशिकी' चित्रपटातून त्याला सिनेइंडस्ट्रीत स्थान मिळाले. त्याने 'जो जीता वही सिकंदर', 'सडक' सारखे चित्रपटही केले. दीपकने एका मुलाखतीत त्याच्या कारकिर्दीबद्दल सांगितले. दीपकने त्याच्या बॉलिवूडमधील ३५ वर्षांच्या प्रवासाबद्दल सांगितले. दीपकला 'आशिकी' चित्रपटातून मोठा ब्रेक मिळाला. पण निर्मात्याने त्याचे प्रमोशन केले नाही. त्याने सांगितले की त्याने चित्रपटाच्या पोस्टरमध्ये दिसण्यासाठी स्वत:चे पैसे गुंतवले होते. दीपक म्हणाला, 'आशिकी' चित्रपटाचे प्रमोशन मुख्य कलाकार राहुल रॉय आणि अनु अग्रवाल यांच्यासोबत खूप झाले होते. पण मी खूप मेहनत घेतली होती. म्हणून मी महेश भट यांच्याकडे गेलो आणि म्हणालो की भट साहेब, मलाही पोस्टरमध्ये ठेवा. म्हणून त्यांनी सांगितले की बेटा, मी तुमच्यासोबत आहे. पण निर्माता सहमत नाही. जेव्हा मी मुकेश भट यांच्याशी संपर्क साधला तेव्हा त्यांनी सांगितले की मी काहीही करू शकत नाही. टी-सीरीज मला तुमच्यासाठी पैसे देत नाही. पोस्टर बनवण्यासाठी मी १० हजार रुपये दिले. माझी पोस्ट प्रकाशित व्हावी म्हणून मी माझ्या खिशातून पैसे दिले. मीही असे काही वेळा पाहिले आहेत. १९९३ मध्ये दीपक स्टार झाला होता. त्याला 'खिलाडी'साठी संपर्क करण्यात आला होता. त्यावेळी अक्षयला दीपकच्या समांतर कास्ट करण्यात आले होते. त्यावेळी अक्षय नवीन होता. दीपक म्हणाला, 'हो, हे खरे आहे. त्यावेळी माझे चित्रपट यशस्वी झाले होते आणि अक्कीने स्वत:ला स्थापित केले नव्हते. त्यावेळी मी अक्षय कुमारपेक्षा मोठा स्टार होतो.' दीपकने सांगितले की त्या चित्रपटात निर्मात्याने दीपक आणि अक्षय यांना समान रीतीने प्रमोट केले होते आणि दीपकला कमी लेखण्यात आले नव्हते.




# शाहरुख-प्रियंका १४ वर्षांनी पुन्हा एकत्र?

बॉलिवूडचा बादशाह शाहरुख खान आणि ग्लोबल स्टार प्रियंका चोप्रा यांच्या जोडीचा एक मोठा चाहतावर्ग आहे. शाहरुख आणि प्रियंका फार वेळा एकत्र झळकले नाहीत. पण, जेव्हा कधी दिसले, तेव्हा प्रेक्षकांच्या मनात घर केलं. २००६ मध्ये आलेल्या 'डॉन' चित्रपटात डॉन आणि रोमा यांची जोडी पाहून प्रेक्षक थक्क झाले होते. त्यानंतर २०११ मध्ये आलेल्या 'डॉन २' मध्ये दोघांचं ॲक्शन आणि रोमान्स पुन्हा एकदा चर्चेचा विषय ठरलं होतं. यावेळी त्याचं अफेअर असल्याच्या चर्चाही तेजीत होत्या. 'डॉन २'नंतर या चर्चांना आणखी हवा मिळाली होती. पण, त्यानंतर दोघेही कधीही एकत्र दिसले नाहीत. आता शाहरुख आणि प्रियंकाला पुन्हा एकत्र पाहण्याची चाहत्यांची इच्छा अखेर पूर्ण होऊ शकते. दिग्दर्शक फरहान अख्तर याने 'डॉन ३' साठी शाहरुख खानला कॅमिओ करण्यासाठी संपर्क साधल्याची माहिती समोर आली आहे.शाहरुखने ही ऑफर स्वीकारली असून तो 'डॉन ३' मध्ये एका खास भूमिकेत झळकू शकतो. प्रियंका चोप्रासुद्धा 'डॉन ३' मध्ये तिच्या रोमा या भूमिकेत पुनरागमन करू शकते. तसे झाल्यास १४ वर्षांनी पुन्हा शाहरुख-प्रियंका एकत्र पाहता येईल. पण, अनेक वर्षांनी शाहरुख आणि प्रियंका एकाच सिनेमात झळकणार असले, तरी त्यांचा एकत्र सीन असेल की नाही, याबाबतही स्पष्ट माहिती समोर नाही. दरम्यान, गेल्या वर्षी अभिनेता आणि दिग्दर्शक फरहान अख्तरने 'डॉन-३' मध्ये रणवीर सिंग मुख्य भूमिकेत असल्याची घोषणा केली होती. तेव्हा त्याला सोशल मीडियावर खूप ट्रोलिंगचा सामना करावा लागला होता, कारण लोकांना या भूमिकेत शाहरुख पहायचं होतं. 'डॉन ३' चे शूटिंग जानेवारी २०२६ मध्ये सुरू होणार असून हा चित्रपट वर्षाअखेरीस थिएटरमध्ये प्रदर्शित होण्याची शक्यता आहे. कृती सेनन हिचीही यात महत्त्वपूर्ण भूमिका असण्याची चर्चा आहे.

# अल्लू अर्जुनसोबत दिसणार मराठमोळी अभिनेत्री



दाक्षिणात्य सुपरस्टार अल्लू अर्जुन आणि ब्लॉकबस्टर दिग्दर्शक ॲटली कुमार यांचा आगामी साय-फाय ॲक्शन थ्रिलर A२२A६' सध्या चर्चेत आहे. अल्लू अर्जुन-ॲटली यांच्या आगामी चित्रपटाच्या पटकथेचं हॉलिवूडमधील काही प्रसिद्ध तज्ञांनी कौतुक केलं आहे. हा एक भव्य चित्रपट असणार आहे. या सिनेमात एक दोन नाही तर तब्बल पाच अभिनेत्री असणार आहेत. सर्वात पहिल्यांदा या सिनेमासाठी अभिनेत्री दीपिका पादुकोण हिच्या नावावर शिक्कामोर्तब झालं. दीपिका पदुकोणनंतर या चित्रपटात रश्मिका मंदानाची एन्ट्री झाली. अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदान्नाची जोडी यापूर्वी 'पुष्पा' चित्रपटात दिसली होती. चाहत्यांना ही जोडी खूप आवडली. दीपिका पदुकोण आणि रश्मिकानंतर समांथाच्या नावाचीही चर्चा सुरू असल्याची माहिती आहे. तर यासोबतच जान्हवी कपूरला हिचीदेखील या चित्रपटासाठी निवड करण्यात आली आहे. दीपिका पदुकोण, जान्हवी कपूर, रश्मिका मंदाना आणि समांथा रूथ प्रभू या स्टारकास्टमध्ये मराठमोळ्या लोकप्रिय चेहऱ्याची भर पडली आहे. जी थेट अल्लू अर्जुनसोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे.अल्लू अर्जुन-ॲटली यांच्या बिग बजेट चित्रपटात एका मराठमोळ्या अभिनेत्रीचाही समावेश झाल्याने मराठी प्रेक्षकांमध्येही उत्सुकता निर्माण झाली आहे. तर ती अभिनेत्री आहे मृणाल ठाकूर जानेवारीमध्ये लूकटेस्टद्वारे तिची निवड झाल्याचं बोललं जात आहे. ही एक प्रतिभावान अभिनेत्री आहे, जिने मराठी, हिंदी आणि तेलुगू चित्रपटसृष्टीत आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. मृणाल ही मुळची महाराष्ट्रातील धुळ्याची आहे. पण तिने तिच्या अभिनयाच्या जोरावर संपूर्ण देशात वेगळं वलय निर्माण केलंय. दरम्यान आतापर्यंत फक्त दीपिकाची A२२A६'साठी निवड झाल्याचं अधिकृत जाहिर करण्यात आलं होतं. निर्मात्यांनी अद्याप इतर कोणत्याही अभिनेत्रीबद्दल कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही.



# चिरंजीवीसोबत झळकणार नयनतारा

'मेगा १५७' या चित्रपटाचे चित्रिकरण सध्या सुरू झाले आहे. या चित्रपटात चिरंजीवी आणि नयनतारा हे दाक्षिणात्य दिग्गज मुख्य भूमिकेत आहेत. तर अनिल रविपुडी यांनी या चित्रपटाचे दिग्दर्शन करण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. अलिकडेच या चित्रपटाच्या टीमने उत्तराखंडच्या मसूरीमध्ये चित्रिकरणाचा दुसरा टप्पा पूर्ण केला आहे. निर्मात्यांनी आता एक छायाचित्र शेअर करत चित्रिकरणासंबंधी माहिती दिली आहे. चिरंजीवीने दिग्दर्शक अनिल रविपुडीसोबत एका कौटुंबिक मनोरंजक चित्रपटासाठी हातमिळवणी केली आहे. या चित्रपटाला तात्पुरत्या स्वरुपात 'मेगा१५७' नाव देण्यात आले आहे. या चित्रपटात चिरंजीवीसोबत नयनतारा मुख्य भूमिका साकारणार आहे. हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाची निर्मिती साहू गरपति आणि सुष्मिता कोनिडेला शाइन स्क्रीन आणि गोल्ड बॉक्स एंटरटेन्मेंट बॅनरच्या अंतर्गत केली जात आहे. या चित्रपटाला भीम्स सेसिरोलेओ याचे संगीत आहे. तर कॅथरीन ट्रेसा या चित्रपटात सहाय्यक अभिनेत्री म्हणून दिसणार आहे.

# अमृता सुभाष 'या' सिनेमात झळकणार



अभिनेत्री अमृता सुभाषची मुख्य भूमिका असलेल्या 'जारण' सिनेमाने यंदाच्या वर्षी मराठी बॉक्स ऑफिसवर दमदार कमाई केल्याचं पाहायला मिळालं. 'जारण'च्या यशानंतर आता अमृता सुभाष पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येण्यासाठी सज्ज झाली आहे. तिच्यासह या सिनेमात महत्त्वपूर्ण भूमिका कोण साकारणार जाणून घेऊ... मराठी चित्रपटसृष्टीत आजवर आपल्या सशक्त अभिनयाने प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण करणार्या सोनाली कुलकर्णी आणि अमृता सुभाष या दोन अभिनेत्री आता प्रथमच एकत्र मोठ्या पडद्यावर झळकणार आहेत. 'परिणती- बदल स्वत:साठी' हा त्यांचा आगामी चित्रपट येत्या १ ऑगस्ट २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अक्षय बाळ-सराफ दिग्दर्शित या चित्रपटाची निर्मिती पराग मेहता आणि हर्ष नरूला यांनी केली आहे. या चित्रपटाच्या नुकत्याच प्रदर्शित झालेल्या पोस्टरमध्ये दोन स्त्रिया दिसत असून, यापैकी एक रंगीबेरंगी पोशाखात, चेहऱ्यावर आत्मविश्वास आणि एक वेगळा आकर्षक बाणेदारपणा जाणवतोय अशा लूकमध्ये पाहायला मिळतेय. तर दुसरी महिला साधेपणात गुंतलेली, कुशीत विसावल्याचं दिसतेय. या दोन्ही महिलांच्या वेगवेगळ्या पार्श्वभूमी आणि भावविश्वाचा संगम चित्रपटाच्या आशयाची झलक देतो. सन्मान, अस्तित्व आणि मुक्ततेसाठी लढणाऱ्या दोन स्त्रियांची ही कहाणी आहे, त्यांच्या लढ्याची कारणं वेगळी आहेत, परंतु दोघींचा उद्देश एकच आहे, तो म्हणजे स्वत:साठी बदल घडवणं. या चित्रपटाविषयी लेखक-दिग्दर्शक अक्षय बाळसराफ म्हणतात, परिणती' या चित्रपटात मी अशा दोन स्त्रियांना एकत्र आणलं आहे, ज्यांची एका वळणावर मैत्री होते आणि त्यातून त्यांचं आयुष्य बदलतं. सोनाली आणि अमृता यांनी या भूमिकांमध्ये जीव ओतला आहे. 'परिणती' ही त्यांच्या वाटचालीची, बंडाची आणि स्वत: ला सापडण्याची कहाणी आहे. 'परिणती' प्रेक्षकांना केवळ मनोरंजनच देणार नाही, तर विचारही करण्यास भाग पाडेल.

# वेड चित्रपटाचा दुसरा भाग येणार

रितेश देशमुखच्या २०२३ मध्ये आलेल्या 'वेड' या मराठी चित्रपटाने अनेक प्रेक्षकांना वेड लावलं होतं. या चित्रपटाद्वारे रितेश दिग्दर्शनात पदार्पण केलं होतं. शिवाय याच चित्रपटातून त्याची पत्नी आणि अभिनेत्री जिनिलीयाने मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केलं होतं. 'वेड' हा चित्रपट २०१९ मध्ये आलेल्या 'मजिली' या चित्रपटाचा रिमेक होता. 'वेड' चित्रपटातील गाणी, संवाद तसंच रितेश-जिनिलीया यांच्यातील केमिस्ट्रीमुळे आजही हा चित्रपट अनेकांचा आवडता आहे. 'वेड'च्या भरघोस यशानंतर अनेकांनी रितेशला या चित्रपटाच्या दुसरितेश देशमुखच्या भागाबदल विचारणा केली होती. अशातच आता स्वत: जिनिलीयाने 'वेड २'बद्दल प्रतिक्रिया दिली आहे. अभिनेत्रीने नुकत्याच एका मुलाखतीत 'वेड २'वर काम सुरू असून लवकरच हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येणार असल्याचं म्हटलं आहे. 'वेड २'बद्दल 'मिरर'शी साधलेल्या संवादात जिनिलीया देशमुख म्हणाली, सध्या मी आणि रितेश आम्ही दोघंही आमच्या वैयक्तिक प्रोजेक्ट्समध्ये व्यग्र आहोत. पण वेळ मिळाल्यावर आम्ही नक्कीच पुन्हा एकत्र काम करू. 'वेड २' ठरलेलंच आहे! त्याला थोडा वेळ लागू शकतो, कदाचित एक किंवा दोन वर्ष. पण प्रेक्षक सतत याबद्दल विचारत असतात; त्यामुळे हा चित्रपट नक्की होणार. यापुढे तिने असंही सांगितलं की, 'वेड' फक्त प्रेक्षकांच्याच नव्हे; तर आमची मुलं रिआन आणि राहील यांच्याही खूप पसंतीस उतरला. आम्ही त्यांना 'वेड' आणि 'धमाल' हे चित्रपट दाखवले आहेत. पण त्यांनी अजून 'जाने तू या जाने ना' चित्रपट पाहिलेला नाही. 'वेड' या सिनेमाची घोषणा झाल्यापासूनच अनेक प्रेक्षक मंडळी आणि रितेश-जिनिलीया यांचे अनेक चाहतेही या सिनेमासाठी उत्सुक होते. 'वेड'ने प्रदर्शनाच्या पहिल्या दिवशी २.२५ कोटींची कमाई केली होती.

# प्रेम हे हवंच. पण, पैसाही महत्त्वाचाच!

तेजस्विनी पंडित मराठी कलाविश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री आहे. आज तिचा 'येरे येरे पैसा ३' सिनेमा प्रदर्शित झाला आहे. तिने आतापर्यंत विविध भूमिका साकारुन रसिकांच्या मनात घर केले आहे. तेजस्विनीच्या सौंदर्यावर, तिच्या एकूणच व्यक्तिमत्वावर चाहते फिदा असतात. तेजस्विनी नेहमी तिच्या वक्तव्यांमुळे चर्चेत असते. ती स्पष्ट आणि थेट बोलते. नुकतंच एका मुलाखतीमध्ये तेजस्विनीनं आयुष्यात कोणत्या गोष्टींचं जास्त महत्व आहे, याबद्दल तिचं स्पष्ट मत मांडलं आहे. तेजस्विनी पंडितनं अलिकडेच 'अजब गजब'ला मुलाखत दिली. यावेळी तिला प्रश्न विचारण्यात आला की आयुष्यात पैशाला किती महत्व आहे?. यावर उत्तर देताना तेजस्विनी पंडितने आयुष्याचं खरं सूत्र सांगितलं. ती म्हणाली, पैसा खुप महत्त्वाचा आहे. पुर्वी असं म्हणायचे की ना की माझ्याकडे प्रेम आहे, मला पैशांची काय गरज. पण, तसं आताच्या जगात नाही होऊ शकत. प्रेम हे हवंच. पण, पैसाही हवाच, स्टेबिलीटी हवी. तेजस्विनी पंडितसाठी पैसा यापेक्षाही एक गोष्ट जास्त महत्त्वाची आहे. ती म्हणजे आरोग्य. तेजस्विनी म्हणाली, पैसा याच्याहीवर काही असेल तर ती एकच गोष्ट आहे, ते म्हणजे तुमचं आरोग्य. ते पैशांच्याही वरती आहे. कारण, तुमचं आरोग्य हे तुम्ही नीट ठेवलं, तर तुम्ही काम करु शकाल, पैसे कमाऊ शकाल, पुढे जाऊन तुमचं आरोग्य बिघडलं तर तुम्हाला ते पैसे कामाला येतील. म्हणूनचं 'हेल्थ इज वेल्थ' असं म्हणतात. सर सलामत तो पगडी पचास ही जी म्हण आहे, ते अगदी खरी आहे. तुमचं आरोग्य खुप महत्त्वाचं आहे आणि त्याकडे तुम्ही लक्ष देण गरजेचं आहे, या स्पष्ट शब्दात तिनं आपलं मत मांडलं. तेजस्विनी पंडितचा 'येरे येरे पैसा ३' चित्रपट आज १८ जुलैला प्रदर्शित झाला आहे. या सिनेमात तेजस्विनीसह सिद्धार्थ जाधव, संजय नार्वेकर, उमेश कामत, विशाखा सुभेदार, आनंद इंगळे, नागेश भोसले, वनिता खरात, जयवंत वाडकर यांच्यासह आणखी काही चर्चित चेहरे आहेत. पहिल्या दोन पार्टच्या यशानंतर आता 'येरे येरे पैसा ३'ची सर्वांना उत्सुकता होती.



# श्रीश्री रविशंकर यांच्या बायोपिकमध्ये दिसणार विक्रांत मेस्सी

'12th फेल' फेम अभिनेता विक्रांत मेस्सीचा 'आँखो की गुस्ताखियां' सिनेमा येत आहे. यामध्ये तो स्टारकिड शनाया कपूरसोबत दिसत आहे. यानंतर तो आगामी सिनेमाची तयारी सुरु करणार आहे,. आध्यात्मिक गुरु श्री श्री रविशंकर यांच्या बायोपिकमध्ये तो भूमिका साकारणार आहे. रविशंकर यांच्यासोबतचा विक्रांतचा फोटोही मध्यंतरी व्हायरल झाला होता. आता सिनेमाबाबतीत काही अपडेट समोर आले आहेत. विक्रांत मेस्सी लवकरच 'व्हाइट' सिनेमाचं शूटिंग सुरु करणार आहे. आध्यात्मिक गुरु आणि आर्ट ऑफ लिव्हिंगचे संस्थापक श्री श्री रविशंकर यांच्या आयुष्यावर सिनेमा आधारित आहे. मिडिया रिपोर्टनुसार, या सिनेमाचं ९० टक्के शूट हे दक्षिण अमेरिकेतील कोलंबिया देशात होणार आहे. हा फक्त बायोपिक नाही तर कोलंबियामध्ये ५२ वर्षांपासून सुरु असलेला संघर्ष रविशंकर यांनी शांततेच्या मार्गाने मिटवला होता. सर्व घटना या कोलंबियातील असल्याने सिनेमाचं शूट तिकडेच होणार आहे. विक्रांत मेस्सीने नुकतंच बंगळुरुतील आर्ट ऑफ लिव्हिंग आश्रमाला भेट दिली. यावेळी त्याने रविशंकर यांनी सुरु केलेल्या हॅपीनेस प्रोग्रॅममध्येही सहभाग घेतला. तिथे त्याने ध्यान, प्राणायम, योग साधना यासोबत रविशंकर यांची विचारधारा समजून घेण्याचा प्रयत्न केला. सिनेमात काम करताना काहीही बनावट किंवा दिखावा वाटू नये यासाठी त्याने सर्व गोष्टींचं निरीक्षण केलं. विक्रांतने आपल्या लूकमध्येही काही बदल करायला सुरुवात केली आहे. त्याने केस आणि दाढी वाढवली आहे. तसंच रविशंकर यांची बोलण्याची स्टाईल, हसणं, चालणं हे सगळं आत्मसात करायला सुरुवात केली आहे. तो त्यांच्या प्रवचनाचे व्हिडिओही बघत आहे. काही दिवसांनी विक्रांत शूटसाठी कोलंबियाला रवाना होणार आहे.






# शाहिदसोबत झळकणार दिशा पाटणी


दिग्दर्शक विशाल भारद्वाज यांचा शाहिद कपूरसोबतचा आगामी चित्रपट सध्या चर्चेत आहे. शाहिदच्या या चित्रपटासाठी नायिका आता ठरली असून याची घोषणा विशाल भारद्वाज यांनीच केली आहे. भारद्वाज यांनी सोशल मीडियावर एक पोस्ट शेअर केली असून यात त्यांच्यासोबत दिशा पाटनी दिसून येत आहे. अत्यंत सुंदर अभिनेत्री दिशा पाटणीसाठी विशेषकरून एक खास कॅमियो लिहिला आहे.

चित्रपटासोबत दिशा पाटणीला जोडण्यासाठी अत्यंत उत्सुक असल्याचे भारद्वाज यांनी म्हटले आहे. दिशा पाटनी या चित्रपटात आयटम नंबर करताना दिसून येऊ शकते. याच्या माध्यमातून दिशा आणि शाहिद ही जोडी पहिल्यांदाच प्रेक्षकांना पाहता येणार आहे. विशाल भारद्वाज यांनी शाहिदसोबत कमीने, हैदर आणि रंगून यासारखे चित्रपट केले आहेत. यातील पहिले दोन चित्रपट यशस्वी ठरले आहेत. तर आता चौथा चित्रपटासाठी दोघेही परस्परांसोबत आले आहेत. विशालचा हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होणार असल्याचे मानले जात आहे. विशाल भारद्वाज हे कलात्मक चित्रपटांसाठी ओळखले जातात. त्यांचा वेगळा असा एक चाहतावर्ग आहे.



# विद्या बालनचा नवा लूक

बॉलिवूडची 'उलाल गर्ल' म्हणजेच अभिनेत्री विद्या बालनने नुकतेच एका मॅगझिनच्या कव्हरपेजसाठी केलेल्या फोटशूटने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. यात ती खूपच सुंदर दिसत आहे. नुकतेच विद्या बालनने मॅगझिन फोटोशूटचे फोटो इंस्टाग्रामवर शेअर करण्यात आले. फोटो पाहून चाहते ४६ वर्षीय अभिनेत्रीच्या दमदार लूकवर प्रेमात पडले आहेत. सोशल मीडियावर शेअर केलेल्या विद्या बालनची आणखी एक कव्हर स्टोरी आली आहे. 'अ फोर्स टू रेकन विथ विद्या बालन' नावाची कव्हर स्टोरी पुरुषप्रधान इंडस्ट्रीत सिनेमाचा व्यवसाय पुढे नेण्यावर आधारित आहे. कव्हरवर, विद्याने डीप नेक असलेला लाल रंगाचा गाऊन, तपकिरी केस आणि किमान दागिने घातले आहेत. तिच्या लूकने इंटरनेटवर सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. सोशल मीडियावर अनेक प्लॅटफॉर्मवर विद्या बालनचे फोटो शेअर झाल्यानंतर, लोकांनी कमेंट केली की अभिनेत्री तिच्या वयापेक्षा खूपच लहान दिसते. एकाने म्हटले, व्वा, ती सुंदर दिसते. दुसऱ्याने म्हटले की, दमदार!! तिच्याकडे अशी स्टाईल करण्याची क्षमता आहे आणि तिने त्यात अधिक प्रयोग करावेत. अनेकांनी बोटोक्स आणि सर्जरीच्या जगात तिला नॅचरल ब्युटी म्हटलंय. अनेकांनी म्हटले की सध्याच्या बॉलिवूड कलाकारांनी तिच्याकडून प्रेरणा घ्यावी.




# संगीत संन्यस्त खड्ग

'ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर लिखित नाटक. आता पुन्हा रंगभूमीवर या नाटकाचे प्रयोग होऊ लागले आहेत.

एक आवर्जून पाहावे असे नाटक.... लेखन म्हणूनही आणि प्रयोग म्हणूनही. त्रिखंडात गाजलेली स्वातंत्र्यवीर सावरकरांची एक कृती (एकमेव नाही) म्हणजे त्यांची मार्सेलीस बंदरातली उडी. या तारखेचे औचित्य साधत ८ जुलै २०२५ पासून या नाटकाचे प्रयोग आता पुन्हा सुरू झाले आहेत.

माझ्या सुदैवाने या नाटकाचा ८ जुलै २०२५ रोजी रविंद्र नाट्य मंदिर इथे झालेला शुभारंभाचा प्रयोग (जो हाऊसफुल होता.) पाहण्याचे भाग्य मला मिळाले.

अतिशयोक्त अहिंसा राष्ट्राच्या नाशाला कारणीभूत ठरते हा सिद्धांत हा या नाटकाचा पाया. शांततेचा पुरस्कार एकट्या दुकट्या राष्ट्राने, आणि तोही एकतर्फी, केलेला पुरस्कार हा आत्मघातकी ठरतो हा या नाटकाचा गाभा. अहिंसामय शांतता मिळवण्यासाठी आणि मिळवलेली टिकवण्यासाठी शस्त्रसज्ज राहावेच लागते हा या संहितेचा अर्थ. ज्यावेळी स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी हे नाटक लिहिले तेव्हा साहजिकच त्यांना एक वेगळा अर्थ आणि संदर्भ अभिप्रेत असेल. नव्हे , तो होताच.

पण.... पण आजच्या अशांत जागतिक परिस्थितीत हे नाटक एका वेगळ्या अर्थाने निश्चितच संदर्भयुक्त ठरते. ऑपरेशन सिंदूर च्या पार्श्वभूमीवर तर निश्चितच....

सावरकर दर्शन प्रतिष्ठान निर्मित आणि नाट्यसंपदा कलामंच सहनिर्मित या नाटकाची निर्मितीमूल्ये अत्यंत दर्जेदार आहेत. नेपथ्य , वेशभूषा , पार्श्वसंगीत , नृत्य , शस्त्रप्रयोग सारेच अतिशय उत्तम आहे. त्याबद्दल दोन्ही निर्मात्यांचे अभिनंदन केलेच पाहिजे....

आता दस्तुरखुद्द प्रयोगा बद्दल...

मी पाहिला तो या पुनरुज्जीवित नाटकाचा पहिलाच प्रयोग होता. तरीही जाणवलेली पहिली गोष्ट म्हणजे नाटकातील सर्वच कलाकारांना त्यांचे संवाद पूर्णपणे तोंडपाठ होते. सावरकरांनी काही दशकांपूर्वी हे नाटक लिहिले आहे. त्यावेळचे लेखी व बोली मराठी आजच्यापेक्षा पूर्ण वेगळे होते. त्यातही ते सावरकरी भाषाशैलीचा अर्क असे हे नाटक आहे. त्यामुळे प्रयोग करताना अभिनयावर लक्ष केंद्रित करायचे असेल तर संवाद तोंडपाठ असणे अत्यावश्यक आहे.

या निकषावर या नाटकातील सर्व कलाकार पूरेपूर उतरतात. त्यामुळे या नाटकातील सर्वच कलाकारांना आपल्या आपल्या भूमिकेचे बेअरिंग घेणे आणि ते नाटकभर सांभाळणे हे तुलनेने सोपे गेले आहे. याचे या नाट्यप्रयोगातील उत्कृष्ट उदाहरण म्हणजे या नाटकात भगवान बुद्धाची भूमिका करणारा ओंकार कुलकर्णी हा कलाकार...

हा कलाकार त्यांचे प्रत्यक्षातील वय, शरीरयष्टी, आवाजाची पट्टी, संवादफेकीचा वेग या साऱ्याच निकषांवर इतका सरस ठरतो की नाटक पाहून बाहेर पडताना हीच भूमिका प्रेक्षकांच्या मनात सगळ्यात जास्त लक्षात राहते. हे या कलाकाराचे यश आहे. कारण संहितेचे ते मर्म नाही.

सेनापती आणि सेनापती पुत्र यांनी घेतलेली शस्त्रसज्जतेची भूमिका उचलून धरणे हे संहितेचे उद्दिष्ट आहे. यावर मात करत ओंकार कुलकर्णी आपली भगवान बुद्ध ही भूमिका उत्तम वठवतात. त्यात त्यांना त्यांच्या अमूल बॉय चेहऱ्याचा पूरेपूर फायदा होतो. (हे पाहताना मला सारखे सीमेवरून परत जा आणि थँक्यू मिस्टर ग्लाड ही दोन जुनी नाटके आठवत होती. त्या नाटकातही संहिता म्हणून अनुक्रमे पौरस आणि विरभूषण पटनायक ही पात्रं महत्वाची होती. पण प्रत्यक्ष प्रयोगात अनुक्रमे सिकंदर आणि मिस्टर ग्लाड भाव खाऊन जायचे.)

तरीही या नाटकात आणि प्रत्यक्ष नाट्यप्रयोगात इतके अप्रतिम संतुलन आहे की हा प्रयोग पुन्हा पुन्हा जाऊन पाहायला हवा असे वाटत राहते. एक जरा गंमतीचा भाग...

या नाटकात सेनापती पुत्राची भूमिका करणाऱ्या नटाचे दिसणे आणि वावरणे एकदम क्रिकेटपटू रवींद्र जडेजा सारखे आहे. प्रयोग पाहताना आणि आज हे लिहिताना सहजच मनात आले की तिकडे सध्या इंग्लंडमधे आपली जी क्रिकेट सामन्यांची मालिका सुरू आहे त्यात तिथे मैदानावर रवींद्र जडेजा जी भूमिका प्रत्यक्षात निभावतो आहे , अगदी तीच भूमिका या नाटकाच्या संहितेत आणि त्यामुळे या नाट्यप्रयोगात सेनापती पुत्राची आहे की!

अजून एक...

एरवी कोणताही क्षण साजरा करताना रवींद्र जडेजा त्याच्या हातातील बॅट खडगा सारखी फिरवतो. पण या मालिकेत सलग ४ डावात अर्धशतक झळकावले तरी त्याने त्याची बॅट खडगा सारखी फिरवलेली नाही.

कारण परिस्थिती तशी नाही...

अशाही अर्थाने संगीत संन्यस्त खड्ग !!!

या नाट्य प्रयोगाचे अजून एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे या नाटकातील दोन्ही स्त्री कलाकारांच्या भूमिका!!!

निव्वळ अप्रतिम हाच एक शब्द त्यासाठी उपयोगात आणावा लागेल. नाटकाचा पहिला पडदा उघडताना या दोन्ही अभिनेत्रींच्या अतिशय सुरेख नृत्याने नाटक सुरू झाल्यापासून शेवटच्या प्रसंगापर्यंत त्या आपल्या भूमिका चोख बजावतात .

त्यांचे दिसणे, त्यांचे असणे, त्यांचे रंगभूमीवर वावरणे, तेही विविध वेशभूषेतील वावरणे, त्यांची संवादफेक, त्यांचे गायन, त्यांचे नृत्य कोणत्याच बाबतीत त्या मागे नाहीत...या नाटकातील तिन्ही गाण्यांना मिळणारा पलश गीश हे त्याचे झळकते उदाहरण आहे.

मयुरा रानडे आणि विशेषत: केतकी चैतन्य, यांच्या रूपाने मराठी रंगभूमीला दोन सशक्त अभिनेत्री (गायिका अभिनेत्री) मिळाल्या आहेत हे नक्कीच! हा नाट्यप्रयोग आजच्या काळात बघताना काही गोष्टी सुचवाव्या असे वाटते...

१. सगळ्यात पहिले आणि महत्त्वाचे म्हणजे या नाटकाच्या निवेदनात मास्टर दिनानाथ यांच्या नावाचा उल्लेख झाला तर ते जास्त सयुक्तिक होईल.

मराठी मानसात स्वातंत्र्यवीर सावरकर, या नाटकाच्या संहितेतून दिलेला संदेश हे जसे आणि जितके संगीत संन्यस्त खड्ग या नाटकाबाबत जोडले गेलेले आहे तितकेच मास्टर दिनानाथ हे नाव संगीत संन्यस्त खड्ग या नाटकाशी जोडलेले आहे.

२. हे नाटक किंवा हा नाट्यप्रयोग दोन अंकी असले तरी ते दोन्ही अंक वेळेच्या दृष्टीने खूप मोठे आहेत. आजचा प्रेक्षक एकाजागी इतका वेळ बसणे, विशेषत: कोरोना नंतरच्या काळात जरा कठीण आहे.

३. या संहितेत व प्रयोगात असणारी शाकंभट या पात्राच्या प्रवेशाची असणारी इतकी लांबी रुंदी आजच्या काळात अनावश्यक वाटते.

४. या नाटकातील प्रसंग बदलताना रंगभूमीवर अंधाराची प्रकाश योजना असताना याच नाटकातील नाट्यपदांच्या ओळी पार्श्वभूमीवर...

५. संगीत संन्यस्त खड्ग या नाटकाचा भर जरी शस्त्र सज्जतेवर असला तरी या प्रयोगात तो रंगभूमीवर प्रत्यक्षात दाखवणे अत्यावश्यक आहे का याचा विचार व्हावा असेही वाटते... अर्थात हल्ली तसे ऊर्मिलायन सारख्या इतरही नाटकात दाखवले जात आहे हे आहेच!

**जाता जाता...**


हा प्रयोग पाहत असताना सारखे मनात येत होते की या प्रयोगामुळे स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे संगीत संन्यस्त खड्ग हे नाटक पुन्हा उजेडात आले. सावरकरांनी अजून दोन नाटके लिहिली आहेत. त्यापैकी उत्तरक्रिया हे त्यांचे नाटकही संगीत संन्यस्त खड्ग इतकेच उत्तम नाटक आहे .

**त्याचेही प्रयोग सुरू झाले तर...**

निर्मिती खर्चाचा विचार करता ते शक्य नसेल तर संगीत संन्यस्त खड्ग आणि उत्तरक्रिया ही दोन नाटके आणि कमला हे महाकाव्य या स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लिहिलेल्या ३ कलाकृतीतील निवडक भाग घेत एक दोन अडीच तासांचा अभिवाचन स्वरूपाचा कार्यक्रम सुरू केला तर .... मी हे नाटक पुन्हा पुन्हा पाहेन हे नक्की. स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित संगीत संन्यस्त खड्ग.

**चन्द्रशेखर टिळक**

# जिनिलीयाचं दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीत पुनरागमन



जिनिलीया देशमुख बॉलीवूडमधील लोकप्रिय अभिनेत्री आहे. नुकतीच ती आमिर खानच्या 'सितारे जमीन पर'मधून झळकली. अशातच आता अभिनेत्रीने तिच्या आगामी दाक्षिणात्य चित्रपटाच्या कार्यक्रमाला हजेरी लावली होती. यावेळी प्रसिद्ध दाक्षिणात्य दिग्दर्शक एसएस राजामौली यांनी तिचं कौतुक केल्याचं पाहायला मिळालं.

जिनिलीया 'ज्युनिअर' या दाक्षिणात्य चित्रपटातून झळकली आहे. हा चित्रपट १८ जुलैला प्रदर्शित झाला आहे. यामध्ये जिनिलीयासह दाक्षिणात्य अभिनेत्री श्रीलीला, अभिनेते राव रमेश, आर. रवीचंद्रन हे कलाकार झळकणार आहेत. राधाकृष्ण रेड्डी यांनी या चित्रपटाचं दिग्दर्शन केलं आहे. जिनिलीयाने या चित्रपटातून तेलुगू चित्रपटसृष्टीत पुनरागमन केले आहे. 'ज्युनिअर' चित्रपटाच्या एका कार्यक्रमाला दिग्दर्शक, निर्माते राजामौलींनीही हजेरी लावली होती. त्यावेळी त्यांनी जिनिलीयाच्या तेलुगू इंडस्ट्रीतील पुनरागमनाबद्दल त्यांची प्रतिक्रिया दिली आहे. राजामौली जिनिलीयाला म्हणाले, किती वर्षे झाले पण तू अजूनही तशीच दिसत आहेस. मी सिनेमॅटोग्राफर सेंथिलला विचारलं होतं की, आपल्याला नवीन जिनिलिया दिसेल का तर तोसुद्धा म्हणाला हो नक्कीच. त्यामुळे मी आतुरतेने तुझी वाट बघत आहे. जिनिलीया यावर म्हणाली, तुम्ही खूप चांगले आहात सर माझ्यासाठी तुमचे हे शब्द फार महत्त्वाचे आहेत. जिनिलीया शेवटचं 'ना इश्तम' या तेलुगू चित्रपटातून झळकली होती. त्यानंतर आता ती 'ज्युनिअर' चित्रपटातून तेलुगू इंडस्ट्रीत पुनरागमन करत आहे. जिनिलीयाने आजवर 'बॉईज', 'सचिन', 'हॅपी', 'बोम्मारिल्लू', 'संतोष सुब्रमण्यम', 'उरुमी' यांसारख्या अनेक दाक्षिणात्य चित्रपटांतून काम केलं आहे. जिनिलीया देशमुखने दाक्षिणात्य इंडस्ट्रीतील अनेक लोकप्रिय कलाकारांसह काम केलं आहे. फक्त दाक्षिणात्य चित्रपटच नव्हते तर तिने हिंदी चित्रपटांतही काम करत तिच्या सहज सुंदर अभिनयाने प्रेक्षकांची मनं जिंकली. लग्नानंतर अभिनेत्री तिच्या नवऱ्यासह मराठी चित्रपटांतही काम करताना पाहायला मिळाली. त्यामुळे अभिनेत्रीचा मोठा चाहतावर्ग आहे. जिनिलीया लवकरच अभिनेत्री 'राजा शिवाजी' या चित्रपटातून झळकणार आहे.



# मालविकाचा विचित्र डाएट प्लॅन

सेलिब्रिटी आणि कलाकारांना अभिनयासोबतच त्यांच्या फिटनेसकडेही लक्ष देणं गरजेचं असतं. ते नेहमीच फिट राहण्याचा प्रयत्न करतात. तर काही वेळेस भूमिकांसाठी कलाकारांना त्यांचं वजन घटवावं लागतं. अनेक कलाकार त्यांची ट्रान्सफॉर्मेशन जर्नीही शेअर करतात. एका साऊथ अभिनेत्रीने दोन आठवड्यांत तब्बल ८ किलो वजन कमी केलं होतं. मुलाखतीत तिने तिचा डाएट प्लॅन सांगितला होता. साऊथ अभिनेत्री मालविका मोहनने १५ दिवसांत ८ किलो वजन कमी केलं होतं. एका भूमिकेसाठी अभिनेत्रीला तिचं वजन कमी करण्यास सांगितलं होतं. त्यामुळे तिने झपाट्याने वजन कमी केलं होतं. पण, यासाठी मालविकाला खूप विचित्र डाएट प्लॅन देण्यात आला होता. अभिनेत्रीने तो फॉलोही केला. पण, चाहत्यांना तिने असा डाएट प्लॅन न करण्याचा सल्ला दिला आहे. मालविका म्हणाली, एका भूमिकेसाठी फॅट पर्सेंट कमी करण्यास सांगितलं होतं. त्यामुळे मी खूपच कमी कार्ब डाएट घेतलं होतं. मी सिनेमात स्टंट सीन्स करत होते. जेवढं मी खात होते त्यापेक्षा जास्त एनर्जी मला स्टंट करताना लागत होती. दिवसातून तीन वेळा खायचे पण खूपच कमी असायचं. मी क्रॅश डाएट फॉलो केलं होतं. दोन आठवड्यांत मी ८ किलो वजन कमी केलं होतं. पूर्ण दिवसात मी फक्त एक सफरचंद आणि एक एग व्हाइट खायचे. त्याव्यतिरिक्त मी काहीही खात नव्हते. आम्हा कलाकारांना असे डाएट फॉलो करावे लागतात. मात्र हे बरोबर नाही.

# करीना कपूर साकारणार भूताची भूमिका



अभिनेत्री करीना कपूरने तिच्या फिल्मी करिअरमध्ये अनेक दमदार सिनेमे दिले आहेत. कधी चुलबुली तर कधी गंभीर भूमिकांमध्येही तिला आपण पाहिलं आहे. करीनाचा मोठा चाहतावर्ग आहे. दोन मुलांच्या जन्मानंतरही तिचं करिअर थांबलेलं नाही. उलट तिला वेगवेगळ्या भूमिका ऑफर होत आहेत. करीना आगामी सिनेमात भूत बनणार असून एका विशीतल्या हिरोसोबत रोमान्स करताना दिसणार आहे. करीना कपूर सध्या ४४ वर्षांची आहे. 'ब्रह्मास्त्र' सिनेमाचे सह लेखक हुसैन दलाल यांच्या आगामी सिनेमात करीना मुख्य भूमिकेत दिसणार आहे. विशेष म्हणजे ही भूताची भूमिका आहे. तर तिच्यासोबत विशीतला अभिनेता रोमान्स करणार आहे. हॉरर वर्ल्डमध्ये ही भूताची कहाणी थोडी रिफ्रेशिंग आणि युनिक असणार आहे. या भूमिकेसाठी करीनाच योग्य असल्याचं त्यांचं मत आहे. अद्याप सिनेमाच्या कास्ट संदर्भात कोणतीही अधिकृत घोषणा केलेली नाही. मात्र आजपर्यंत अभिनेत्यांनीच कमी वयाच्या अभिनेत्रींसोबत रोमान्स केल्याचं अनेकदा आपण पाहिलं आहे. आता करीना कोणासोबत दिसणार हे पाहणं इंटरेस्टिंग असणार आहे. हुसैन दलाल यांनी अयान मुखर्जीच्या 'ब्रह्मास्त्र पार्ट १'चे संवाद लिहिले होते. तसंच त्यांनी 'मार्गरिट विथ द स्ट्रॉ', '२ स्टेट्स', 'ये जवानी है दिवानी', 'शेमलेस' अशा अनेक सिनेमांसाठी काम केलं आहे. करीना कपूरने २०१६ साली आलेल्या 'की अँड का' सिनेमात अर्जुन कपूरसोबत रोमान्स केला होता. करीना अर्जुनपेक्षा ४ वर्षांनी मोठी आहे. दोघांनी सिनेमात किसींग सीन्सही दिले होते. त्यांच्या सिनेमाची खूप चर्चा झाली होती. तसंच सिनेमाचा विषयही अनेकांना भावला होता. करीना लवकरच मेघना गुलजारच्या आगामी 'दायरा' सिनेमातही दिसणार आहे. यामध्ये तिच्यासोबत अभिनेता पृथ्वीराज सुकुमारन आहे.



# विजय सेतुपतीच्या चित्रपटात तब्बू खलनायक

तब्बूची गणना अशा काही बॉलिवूड अभिनेत्रींमध्ये होते ज्यांनी त्यांच्या कारकिर्दीत वेगवेगळ्या प्रकारची भूमिका साकारली आहे. तिने रोमँटिक भूमिकांपासून ते ग्रे आणि नकारात्मक भूमिकांपर्यंतच्या चित्रपटांमध्ये काम केले आहे. आता तब्बूच्या पुढील भूमिकेबद्दल एक मोठी माहिती समोर येत आहे. पुन्हा एकदा तब्बू पडद्यावर वेगळ्या शैलीत दिसू शकते. काही दिवसांपूर्वी निर्मात्यांनी अशी माहिती शेअर केली होती की पुरी जगन्नाथ दिग्दर्शित चित्रपटात तब्बू विजय सेतुपतीसोबत स्क्रीन शेअर करताना दिसणार आहे. आता या चित्रपटात तब्बू नकारात्मक भूमिकेत दिसणार असल्याच्या बातम्या येत आहेत. माध्यमातील वृत्तानुसार, पुरी जगन्नाथच्या चित्रपटात तब्बू खलनायकाच्या भूमिकेत दिसू शकते. परंतु निर्मात्यांनी अद्याप याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती शेअर केलेली नाही. त्यामुळे सध्या हे फक्त वृत्त आहे. तसे, तब्बू याआधीही अनेकदा पडद्यावर खलनायिकेच्या भूमिकेत दिसली आहे. तब्बू यापूर्वी 'मकबूल', 'फितूर', 'हैदर' आणि 'अंधाधुंद' सारख्या चित्रपटांमध्ये नकारात्मक भूमिकांमध्ये दिसली आहे. या सर्व चित्रपटांमध्ये तब्बूची भूमिका खूप आवडली होती. अशा परिस्थितीत, जर तब्बू पुन्हा एकदा खलनायिकेच्या भूमिकेत दिसली तर तिला पाहणे खास असेल. पुरी जगन्नाथचा हा शीर्षक नसलेला चित्रपट भारतभर पसरलेला असेल. यात विजय सेतुपती आणि तब्बू मुख्य भूमिकेत दिसतील. चित्रपटाबद्दलची उर्वरित माहिती अद्याप समोर आलेली नाही. कामाच्या बाबतीत बोलायचे झाले तर, तब्बू प्रियदर्शनच्या हॉरर- कॉमेडी 'भूत बांगला' चित्रपटाची तयारी करत आहे, ज्यामध्ये अक्षय कुमार, जिशु सेनगुप्ता आणि वामिका गब्बी मुख्य भूमिकेत आहेत. हा चित्रपट पुढील वर्षी प्रदर्शित होण्याची अपेक्षा आहे.